GANGOTREE
H·O·M·E·S

दिनांक: ०६.११.२०२६

प्रति,

मा. अध्यक्ष / सचिव,

प्रेमानंद बी को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लि.

विषय : पहिल्या मजल्यावरील संलग्न (Attached) टेरेस लगतच्या फ्लॅटधारकांना देण्याबाबत सोसायटीची अंतिम मान्यता व ठराव मंजूर करण्यासाठी विशेष सर्वसाधारण सभा (SGM) आयोजित करण्याबाबत विनंती पत्र.

महोदय,

आम्ही आपल्या सोसायटीसोबत निष्पादित केलेल्या नोंदणीकृत डेव्हलपमेंट ॲग्रीमेंटनुसार A व B या दोन्ही इमारतींच्या पुनर्विकासाचे काम करीत आहोत.

सदर डेव्हलपमेंट ॲग्रीमेंट च्या आधारे व त्यानुसार आम्हाला प्राप्त असलेल्या अधिकारांच्या अनुषंगाने, पहिल्या मजल्यावरील उपलब्ध होणारे संलग्न (Attached) टेरेस लगतच्या फ्लॅटधारकांना देण्याबाबत आम्ही यापूर्वीच काही संबंधित फ्लॅटधारकांना कमिटमेंट दिलेल्या आहेत.

तथापि, सदर विषयाच्या अंमलबजावणीसंदर्भात काही बाबींमध्ये स्पष्टता व अंतिम निर्णय होणे आवश्यक असल्याने मागील दोन महिन्यांमध्ये सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांसोबत दोन वेळा चर्चा करण्यात आली. त्याच अनुषंगाने आज झालेल्या बैठकीमध्ये सदर विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

आजच्या बैठकीतील चर्चेनुसार, पहिल्या मजल्यावरील संलग्न (Attached) टेरेस लगतच्या फ्लॅटधारकांना देण्यासंदर्भातील विषय सोसायटीच्या जनरल बॉडीसमोर मांडण्यात यावा व त्यावर चर्चा करून सोसायटीची अंतिम मान्यता दर्शविणारा आवश्यक तो ठराव मंजूर करण्यात यावा, असे ठरले आहे. त्यानुसार, सदर विषयास अंतिम स्वरूप देण्यासाठी सोसायटीने विशेष सर्वसाधारण सभा (Special General Meeting – SGM) आयोजित करून त्यामध्ये आवश्यक ती कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

सदर मान्यता व ठराव वेळेत प्राप्त होणे अत्यंत आवश्यक आहे. कारण संबंधित फ्लॅटधारकांना यापूर्वी दिलेल्या कमिटमेंट्सची पूर्तता करणे तसेच पहिल्या मजल्यावरील फ्लॅटचे फिनिशिंग व पुढील बांधकामविषयक कामे नियोजित वेळेत पूर्ण करणे यासाठी या निर्णयाची आवश्यकता आहे.

या प्रक्रियेमध्ये कोणताही अनावश्यक विलंब होऊ नये व विकासकामांच्या नियोजनावर किंवा कामाच्या गतीवर विपरीत परिणाम होऊ नये, ही आमची अपेक्षा आहे.

तरी, वरील सर्व बाबींचा सकारात्मक विचार करून सोसायटीने तातडीने विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करावी व सदर विषयावर आवश्यक ती अंतिम मान्यता व अधिकृत ठराव मंजूर करून आम्हाला सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

धन्यवाद.

आपले विश्वासू,

मे. गंगोत्री होम्स तर्फे भागीदार

Gangotree Homes Pune

श्री. राजेंद्र आवटे